१९६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५२८

रविकिरण मंडळाचें सेहेचाळीसावें पुस्तक


# मुठे! लोकमाते!

REFBK-0011970
REFBK-0011970

शवंत

महाराष्ट्र कवि

# उठे! लोकमाते!



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक ३१३५५ वि: ८१८.८८
क्रमांक १५१८ नों: दि: ३०.५.५९
११९८०
REFBK-0011970
REFBK-0011970

रविकिरण मंडळाचें सेहेचाळीसावें पुस्तक

# मुठे ! लोकमाते !

यशवंत

महाराष्ट्र कवि

© य. दि. पेण्ढरकर, १९६१

मुखपृष्ठ : स्टुडियो डी. जी. जी.

प्रथम मुद्रण :
सप्टेंबर १९६१
श्रावण १८८३

मूल्य : एक रुपया

मुद्रक :
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक :
य. दि. पेण्ढरकर
१९६ / ३४, सदाशिव
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

*जयांना मिळाली समाधी जळीं*
*तयांना अर्पितो हा श्रद्धांजलि*
*आणि जे पीडित तयां कांहींसा*
*मिळावा यांतून धीर–दिलासा*

दि. १२ जुलै १९६१

रोजच्या प्रमाणें चि. कला सकाळीं खडकवासल्याला नोकरीवर गेली आणि लगेच दहा–पावणे दहाच्या सुमारास परत आली. " कां ग ? " असें विचारतांच ती म्हणाली, " धरण फुटलंय्! आम्हांला पोंचल्या पावलींच परत पाठवून दिलं. "

नगरभक्षक बकासूर मोकाट सुटला असल्याची पहिली चाहूल अशी लागली, पहिली वर्दी अशी मिळाली !

पुढच्या प्रळयंकर घटना, जीवनविध्वंसक आपत्ति आणि उद्‌भवलेल्या उग्र विवंचना यांचेबद्दल यथार्थ लिहायला न पुरे ही वाणी. तरी पण, ह्यांतून वावरतांना हे शब्द फुटलेच.

क्र. ११९८४०

# मुठे ! लोकमाते !

[ मुक्त छंद ]

फुटलें पानशेत !
फुटलें खडकवासला !
आलें पाणी तुफान
पळा, पळा, पळा !

पळणारांचा पाठलाग
करीत आलें पाणी
मागुनी पुढुनी
गल्लीबोळांतुनी.

होतें सरळ सूत
चौताळलें महा भूत
निघे धिंगाणा घालीत
बुभुःकार करीत.

## दि. १२ जुलै १९६१

रोजच्या प्रमाणें चि. कला सकाळीं खडकवासल्याला नोकरीवर गेली आणि लगेच दहा–पावणे दहाच्या सुमारास परत आली. " कां ग ? " असें विचारतांच ती म्हणाली, " धरण फुटलंय्! आम्हांला पोंचल्या पावलींच परत पाठवून दिलं. "

नगरभक्षक बकासूर मोकाट सुटला असल्याची पहिली चाहूल अशी लागली, पहिली वर्दी अशी मिळाली !

पुढच्या प्रळयंकर घटना, जीवनविध्वंसक आपत्ति आणि उद्भवलेल्या उग्र विवंचना यांचेबद्दल यथार्थ लिहायला न पुरे ही वाणी. तरी पण, ह्यांतून वावरतांना हे शब्द फुटलेच.

११९८७०

# मुठे ! लोकमाते !

[ मुक्त छंद ]

फुटलें पानशेत !
फुटलें खडकवासला !
आलें पाणी तुफान
पळा, पळा, पळा !

पळणारांचा पाठलाग
करीत आलें पाणी
मागुनी पुढुनी
गल्लीबोळांतुनी.

होतें सरळ सूत
चौताळलें महा भूत
निघे धिंगाणा घालीत
बुभुःकार करीत.

पुलांनाही त्यानें
घातला क्षणांत वेढा
पळणारांच्या पायांत
पडला त्याचा खोडा

मुठेनें मांडला
आडमुठेपणा
कजाग पिसाट
आक्रस्ताळेपणा

अक्राळ-विक्राळ
उघडला जबडा
बेहोष लाटांच्या
परजल्या दाढा

स्थिरचरा वेगें
घालून गराडा
करून टाकला
चुराडा, रबडा.

पुलांच्या कमानी
राहून इमानी
कापीत होत्या
पुराचें पाणी.

परंतु कठडे—
काय त्यांचा पाड ?
कोयत्यानें जैसें
तोडावें चिपाड

तैशाच तयांच्या
उडाल्या ठिकऱ्या
उडवाव्या जैशा
कागदी चिटोऱ्या.

लोखंडी खांब
लोखंडी तुळया
जाहल्या त्यांच्या
चोयट्या चोया !

चुना – सिमिटाची
भक्कम फरसूबंदी
परंतु पाण्याची
केव्हढी ही धुंदी ! —

उडे फरसूबंदी
फोलपटासारखी
फुंकरीनें उडणाऱ्या
पापुद्र्यासारखी.

चेंडूनें कोलमडते
लगोऱ्यांची उतरंड
तैशा कोसळल्या
हवेल्या प्रचंड

अवखळ लोंढा
त्याच्या मुसंडीनें
ताठहि विरघळे
ढिसूळपणें.

सोंडेच्या विळख्यानें
हत्ती मदोन्मत्त
हिसकतो झाडें
मुळांसकट

पुराच्या कवेंत
चिरेबंदी वाडे
कागदी ताबुता–
परी झाले थंडे.

हाजरो संसार
गेले रसातळीं !
हजारो कुटुंबें
उघडीं पडलीं !

कितीकांना आतां
उद्यांचीच भ्रान्त
कितीकांनीं मूक
मांडला आकान्त

करतील कसा मोठ्यानें
आक्रोश बिचारे ?
चिखलांचे त्यांच्या
तोंडांत तोबरे.

अये सुवासिनी,
सुठे, लोकमाते,
मिरविसी ह्यांत
श्रेय कोणतें ?

गाळून घाम
जोडून दाम
अपेक्षिला ज्यांनीं
कांहीं आराम

चिरडून त्यांचें
विश्रामधाम
लाविलेंस त्यांना
म्हणायास ' राम ' !

अये सुवासिनी,
मुठे, लोकमाते,
मिरविसी ह्यांत
श्रेय कोणतें ?

स्रवावे ज्यांतून
वात्सल्य–पाझर
यावा कां त्यांतून
कालकूट–पूर ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 31354 वि: ......
क्रमांक 1528 नों: दि: 3/9/55

चित्रपटांतलें
संगीत–सूर
टाळ–मृदंगांनीं
घुमलें गोपूर

जीवितीं दुःख
पर्वताएव्हढें
सुख पाहूं जातां
तें जवापाडें

तरीही जवाचा
ऐसा विलास
जियेच्या दो तटीं
येई भरास

आणि दोन्हीही
काठांवरल्या
नक्षत्रमाळाच
शोभल्या हवेल्या

आणि मिरवीत
होती जी त्यांतून
तीच आज त्यांना
बसली गिळून !

उजाड ढिगारे
आतां दों तटीं
वाहतां यांतून
सौभाग्यवती !—

काय साधलेस
निर्मून स्मशान ?
स्मशानच काय
तुजला भूषण ?

ढुशीनें टाकला
उलथून नंदी
दीपमाळेची त्या
उडविली चंदी

हंड्या–झुंबरांनीं
होता शोभीवन्त
लागावी तयाची
काय धडगत ?

कलता झुलता
विदीर्ण मंडप
स्पर्शेंहि करील
वाटे लपलप !

कुठें शिखरही
दिलें ढकलून
आदळतां धूड
जमीन आरून

विवर एव्हढें
झालें कीं निर्माण
त्यांत शिखरही
गेलें सामावून.

मात्र देवमूर्ति
अव्यंग अचल
ईश्वरी सत्तेचें
दाखवी नवल.

लेकरांना दुरावले
त्यांचे मायतात
मायतातांच्या गळ्याला
लागली पाण्याची तात

आणि वाहवले
गटंगळ्या खात !
महापुरांत
पुरे कां पडतात —

शूर साहसी
तारणारे हात ?
साऱ्यांचीच झाली
ठार वाताहात !

होती वणवण
भटकत आई
चिखल-माखल्या
दमल्या पायीं

गर्दीत दिसला
तियेचा कलिजा
धावली म्हणत
‘ अरे माझ्या राजा ! ’

आणि गळां त्याच्या
घालूनिया मिठी
भर चव्हाट्यांत
रडे दुःखी–कष्टी.

घालावी कुणाची
कुणी समजूत ?
रंजले गांजले
सारे एकजात !

शिजवाया कांहीं
अन्न–पाणी नाहीं
शिजवाया कांहीं
भांडेंकुंडें नाहीं.

उरे चिरगूट
फक्त एक नेसूं !
नाहीं डोळां पाणी
गाळायाहि आसूं !

ऐशा पीडितांची
गर्दी सभोंवार
उरलें नव्हतें
ज्यांना घरदार

त्यांतलाच म्हणे
" रडूं नको माय !
भेटला ना पोर ?
भाग्य कमी काय ?

काय तुला सांगूं
माझी कर्म-कथा !
अखेरचा पल्ला
थोडकाच उरला होता.

तोंच हारपलें माझें
झोंपडें, रोपडें !
पाहूं मी कुणाच्या
सांग तोंडाकडे ? "

आणि समोरून
येत होते दोन
पंडित विद्वान
उदास-लोचन

भेटीमाजीं त्यांनीं
पुसावें कुशल
कोणी, कोणा, काय ?
दोघेहि विकल.

एकैक अक्षरांची
मागूनिया भीक
किती तरी झाले
होते ते धनिक.

पुस्तकें टिप्पणी
तयांची दौलत
जाहली लगदा
चिखल–रेंद्यांत.

भकास–लोचन
उद्विग्न–मानस
म्हणती सुठेस
टाकीत निःश्वास —

“ तुझीच बहीण
नदी इंद्रायणी
तिनें तुकयाची
अभंग वाणी

नाहीं रिचविली
आपुलिया पोटीं
कशी अलगद
आणिली वरती !

जीवित – सर्वस्व
दिलें ज्याचें त्याला
दाविला जगाला
कौतुक – सोहळा.

खलाची करणी
रुचली ना तिजला
खलाच्याच मुखा
चिखल फासला.

राहिली आपण
उदार पुनीत
करून दुर्जना
पुरता फजीत

मुठे ! लोकमाते !
तुवां केलें मात्र
हस्तलिखितांतें
पार गिळंकृत.

केलेस कंगाल
फक्त ना निर्माते ;
आजचे उद्यांचे
रसिक चहाते

आततायीपणें
केलेस करंटे !
पापाची धनीण
झालीस ह्या मुठे !

आज हिंडतांना
कांठावरुनी ह्या
उचलेना पाय
ऊर भरुनिया.

पाय आडखळे
ढिगाऱ्यांवरती !
काय असेल ह्या
ढिगाऱ्यांखालती ?

पडकें भिंताड
मोडक्या खिडक्या
चिरगुट–चिंध्या
कुजक्या सडक्या

फुटकीं रुतलीं
मडकीं गाडगीं
जयांत कुणाची
होती 'जिंदगी'

११९८०

रोग्याच्या दिसती
जैशा बरगड्यां
उरल्या तैशाच
कुठें काड्या–मोड्या

पडझड ऐशी
दिसते भवतीं
गमे कीं हडळी
दांत विचकती !

भगदाडांतून
कुठें ये दिसून
कोनाड्यावरलें
'श्रीलक्ष्मी प्रसन्न'

परि मिळतांच
मुठेची संगत
तिनें धरली कीं
माहेराची वाट !

ढिगाऱ्यांमधील
विटा, तोडी, चिरे—
कुणाकुणाच्या हे
मनींचे मनोरे

असतील येथ
धुळीला मिळाले!
ह्याचमुळें माझा
पाय आडखळे.

आणि मिळुनिया
कुणा मूठमाती
ढिगाऱ्याखालतीं
असतील अस्थि

करीत प्रतीक्षा—
'कोण करणार—
कधीं होईल कां
क्रियाकर्मान्तर?'

फटींतून येथें
वारा जो उधसे
त्यांतून कीं येती
वर हे उसासे!

रोग्याच्या दिसती
जैशा बरगड्या
उरल्या तैशाच
कुठें काड्या–मोड्या

पडझड ऐशी
दिसते भवतीं
गमे कीं हडळी
दांत विचकती !

भगदाडांतून
कुठें ये दिसून
कोनाड्यावरलें
'श्रीलक्ष्मी प्रसन्न'

परि मिळतांच
मुठेची संगत
तिनें धरली कीं
माहेराची वाट !

ढिगाऱ्यांमधील
विटा, तोडी, चिरे—
कुणाकुणाच्या हे
मनींचे मनोरे

असतील येथ
धुळीला मिळाले!
ह्याचमुळें माझा
पाय आडखळे.

आणि मिळुनिया
कुणा मूठमाती
ढिगाऱ्याखालतीं
असतील अस्थि

करीत प्रतीक्षा—
'कोण करणार—
कधीं होईल कां
क्रियाकर्मान्तर?'

फटींतून येथें
वारा जो उधसे
त्यांतून कीं येती
वर हे उसासे!

कोण हा घोटाळे
कावरा–बावरा ?
चौकटीपासला
गोंजारी कोपरा !

" काय म्हणूनिया
विचारितां काय ?
आणि अभागी मी
सांगू तरी काय ?

अहो,
हाच तो कोपरा
हीच ती चौकट
इसार – पावती
इथें झटपट—

मिळून रंगलें
संसार – संगीत.
नव्हे ही चौकट
सारंगी साक्षात !

नको गुटमळूं
तरी करूं काय ?
इथून निघावा
कसा माझा पाय ?

तुम्ही ?
नका हो येथून
मजला ढकलूं ! "
आर्जवून धाय
लागला मोकलूं.

इतुक्यांत एक
कुटुंबवत्सल
परिचित दिसे
पुढें स्नेहशील

' ठीक आहे ना हो ? '
पुसतां त्याजला
" खैर देवाजीची ! "
म्हणत बोलला —

" काय सांगूं, राव !
प्रसंग कठीण
कांपरें भरतें
येतां आठवण.

' पाणी आलें पाणी
आलें अंगणांत!
आलें उंबऱ्यांत!'
मुलें ओरडत —

जेव्हां बिलगलीं
येऊन मजला
घाबऱ्या-घुबऱ्या
वरचा मजला—

गांठला सर्वांनीं;
तोंच मागोमाग
ठाकलें करीत
पाणी पाठलाग.

वेगें निरुपायें
गांठली तों गच्ची
घेउनी पोटींशीं
दीन कच्चीं-बच्चीं.

होतें सभोंवार
पाणी घुसळत.
होतीं आगेंमागें
घरें कोसळत.

आरडा–ओरडा
येत होता कानीं.
‘सोडवा, वाचवा’
फोडी टाहो कोणी !

वैरी ना चिंती तें
येऊन तों मनीं
जिवाचें जाहलें
पाणी पाणी पाणी !

‘काय आलें आज
माझ्या नशिबास !
ज्यांना जोपासले
भरवून घास—

मुलें नातवंडें
पिलें हीं कोंवळीं
पिसाळलें पाणी
घेणार कीं बळी ?

माझियासमोर ?
डोळियां देखत ?–’
कांपरें भरतें
अजून उरांत !

टळलें संकट !
आम्ही भाग्यशाली !
आला नव्हता काळ
जरी होती वेळ आली.

असाच परंतु
दारुण अनर्थ
ओढवला कीं हो
दुसऱ्या पेठेंत !

देखत-देखता
कुटुंबच्या कुटुंब
घर कोसळून
जळांत तुडुंब

जाहलें गडप
असहायपणें
'राम' नाम घेत
मुखीं शांतपणें."

[ छंद देवीवर ]

ऐशा कथा-कहाण्यांची
किती करावी गुंफण
महा विस्तीर्ण तुझिया
होती पुराची रापण.

ज्वालामुखी भडकून
उफाळतो लाव्हारस
टाकी व्यापून हजारो
मैल औरस-चौरस.

करी नगरी गडप
आल्या भरभराटीस
उरूं देत नाहीं त्यांचा
मागें कांहीं मागमूस.

मुठे ! महापूर तूझा
जरी होय थंडगार
लाव्हारसासारखाच
त्यांत भक्षक अंगार

त्यांत गाढला नांदता
नोहे फक्त वर्तमान;
कुठें कुठें नष्ट झाली
ऐतिहासिकाची खूण !

निरपून ' पुष्करिणी '
आम्ही चितारली पाटी
मनीं चिडून, पाहून
तऱ्हा आमुची करंटी

काय उरल्यासुरल्या
काठावरल्या निशाण्या
मुठे, तुवां उधळल्या
लाथेसरशी, पुराण्या ?

कुठें होतें वृंदावन
देत जीवा विरंगुळा
कुठें कबर, समाधी,
होती पूज्य ज्याची त्याला.

कसा प्रक्षुब्धपणाने
फिरविला सर्वांवर
मुठे, लोकमाते, कां हा
पुराचा बुल्डोझर !

गोठ्यांतलीं गुरें ढोरें
सोप्यांतलीं अवजारे
गंजी, बळद, शिवारें
वाहवलें सारें सारें !

पिढ्या–पिढ्यांच्या प्रयालें
कणा–कणानें भरलीं
फांद्यांसह वाहवलीं
संचिताचीं मधपोळीं.

वाडवडिलांपासून
अग्निहोत्र चाललेलें
भ्रष्ट केलें, नष्ट केलें
मुठे, मूढ रजस्वले !

सुवासिनींनीं हौसेनें
असतील तुझ्या पात्रीं
ज्योतिष्मती निर्मियेल्या
दिवे सोडोनिया रात्रीं

आज त्यांतील कुणांच्या
कुलदीप-जीवज्योति
असशील मालवल्या !—
किती निष्ठुर ही नीती !

ऐशा विध्वंस-कथांची
किती करावी गुंफण
महा विस्तीर्ण तुझिया
होती पुराची रापण.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39354 वि: काव्य
क्रमांक 9428 नों: दि: 30.9.61

[ मुक्त छंद ]

करून फुंफाट
करून विध्वंस
आतां पात्रांतून
संथ वाहतेस.

वैभव–संपन्न
तटींचे बंगले
लक्ष्मीच स्वकरें
चवऱ्या–मोर्चलें

होती तुजवर
वारीत खुषींत
आतां राहिलेत
ढिगारेच तेथ.

विध्वंसाच्या राशी-
मधून वाहता
वाटत असावी
तुज विषण्णता.

म्हणुनीच काय
चाललीस संथ ?
कशी लपावी गे
अंतरींची खंत !

महापुरें झाडें जातीं
तेथें लव्हाळे वाचती

वागती जे कोणी
गर्विष्ठ ताठ
त्यांस हा संतांचा
नम्रता-पाठ.

संतांच्या वाणीचा
ऐकून गजर
आली कां तुजला
राक्षसी लहर—

खरेंच हीं झाडें
लोळवावीं खालीं
आणि दाखवावीं
लव्हाळीं वाचलीं ?

संतांची वाणी
त्रिवार सत्य.
प्रचीति द्यायाला
तिची, हें नृत्य—

तुझें प्रळयंकर
काय हवें होतें ?
शब्दशः घेती ना
कोणी दृष्टान्तातें.

पुराचें पाणी
आतां ओसरलें.
कोसळले वृक्ष
वाचले लव्हाळे.

परंतु लव्हाळे
वाचून काय
होईल पक्ष्यांच्या
घरट्यांची सोय ?

पिकून चौफेर
लव्हाळ्यांचीं शेतें
भुकेजल्यांचीं कां
भरतील पोटें ?

गमे हीच दिसे
सर्वतोपरि
गाढ विषण्णता
तुझ्या चर्येवरी

( अनुष्टुप् )

ही कोण बैसली व्यक्ति
दगडी पुतळ्यापरि ?
विमनस्क अशी कां ही
हूं–कीं–चूं कांहिं ना करी ?

अंधार कोंदला नेत्रीं
आहेत उघडे जरी
जरी प्राण कुडीमाजीं
त्राण गात्रांत ना तरी.

कालचें पावलें नाश
उद्याची आस ना उरे
निराधार उभा राहूं
शकतो ‘ आज ’ कां बरें ?

असावा अंतरीं तीच्या
हाच कीं वडवानल ?
बाह्यात्कारीं जरी आहे
शून्यलोचन निश्चल.

श्रियाळा, चांगुणे, सोड
ही किंकर्तव्य-मूढता
अगा, झाली पराभूता
पहा मुठाच तत्वत:

सर्वस्व विलया गेलें
नुरला अणु-रेणु ही
अगा, शौर्यव्रता येते
जिंकाया फिरुनी मही.

अणूपासून ब्रह्माण्डा–
एव्हढें व्हायचें कसें
कळों ये भक्ति–शक्तीचें
जरी जीवा जडे पिसें.

प्रत्यंचा ताणुनी बाण
धनुष्या लावता पहा
'त्राहि माम्' हात जोडोनी
याचितो सिंधुही महा.

तरी कां हात लावोनी
कपाळा, बैसणें असें?
ललाटींच्याहि लेखाचे
पुसोनी टाकुं या ठसे.

वस्तु कप्प्यांत चित्ताच्या
जियेला बोलती जिद्द
तिनें झुंजावया ठाकूं
रोमरोमीं जरी विद्ध.

मुठेनें क्रुद्ध पाण्याची
अम्हाला मारुनी मूठ
आम्हाला पाजिलें पाणी
भुईला लावली पाठ

भुईला लागतां पाठ
दुणावोनी उठे ताठ
मऱ्हाटी – कुंतिचा पुत्र
भीम तो हा महाराष्ट्र!

मुठेला दाखवायातें
ऐसें अंगांतलें पाणी
घुमे ऐका ढिगाऱ्यांच्या
विटा–तोंडींतुनी वाणी.

मोडकें-तोडकें आहे
कुसूं कोठें, कुठें भिंत
स्वार त्यांच्यावरी व्हावें
मनींची त्यागुनी खंत

येतसे चालवायातें
अहो निर्जीवही भिंत
नसे कां दावुनी गेला
महा ज्ञानी महा संत ?

चरित्रें कीर्तनासाठीं
काय अभ्यासणें फक्त ?
त्यांचिया स्फूर्ति-सामर्थ्यें
सळ्‌सळाया हवें रक्त.

' पाहिलें नव्हतें कोणी
ऐकिलें नव्हतें कधीं
न भूतो न भविष्यति
ऐशी फोफावली नदी '—

ऐशा आश्चर्यवत् गोष्टी
कांहीं बोलावया हव्या
म्हणोनी चालु द्या त्या हो
परंतु काय ह्या नव्या ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 39354 वि: काव्य
क्रमांक 2428 नों: दि: 30-9-15

युगामागें युगें गेलीं
जरी ध्यानांत आणाल
तरी येईल ध्यानीं कीं
नव्हे ही आजची बात

एक ना, दोन ना, मागें—
कल्पान्त जाहले कैक
परंतु मानवानें कां
तयांना घातली भीक?

पर्वतप्राय लाटांनीं
करूं ये खाउं कीं गिळूं
मानवानें निजोद्योगीं
निष्ठा नाहीं दिली ढळूं

उभी काडींतुनी माडी
करूं, हा ध्यास मानवा
माडी मोडून बांधूं कीं
तळें, हा छंद घे नवा

त्याला एकच हव्यास
निर्मूं कांहीं नवें नवें
प्राप्त घेऊं करोनी तें
वाटलें जे हवें हवें.

त्यांत पंच महाभूतां—
पैकीं आलें कुणी आड
हतबुद्ध मनुष्यातें
कराया, घातली धाड.

तेव्हढ्यानें हटायाचें ?
दडायाचें कुठें तरी ?
सावरोनी उठायाची
हिरीरी पाहिजे उरीं.

आरंभापासुनी आहे
निसर्गाशींच सामना !
वर्ततां, विस्मृति याची
होऊं देऊं नये मना.

आंत रेटीत रेटीत
नदीचें पात्र व्यापिलें
दंडेलीनें तिनें आज
पुन्हां तें बळकावलें

क्षोभ तो प्रहराचाच !
निवाल्यावरि तो पुन्हां
लागायास निजोद्योगा
उभारी पाहिजे जनां

उद्योग ना करायाचा ?
काय हो करणें तरी ?
'हाय, हाय' किती काळ
माळ ही जपणें करीं ?

पडतां झडतां वाढे
नेणता शिशुही पहा
जन्मापासून जीवाच्या
दिसे ही प्रेरणा महा.

उद्योगांतहि जीवाला
हीच दे प्रेरणा बळ
साहाया आलिया हानी
राहाया तेंवि निश्चळ.

बुद्धि आहे, शक्ति आहे
आहे कल्पकता, कला.
हतप्रभ तरी होणें
शोभे कां मनुच्या कुला ?

वास्तव्य मृत्युलोकींच
लाभलें मानवाप्रती
जायाचीच लया त्याची
तरी प्रत्येक निर्मिती.

हाच शाप मुळारंभा-
पासोनी दिसतो मला
सारा अशाश्वताचाच
नव्हे का स्पष्ट मामला ?

सुपारी ह्याच शापाची
गांठीला नित्य बांधुनी
प्रस्थान ठेविता झाला
मनुष्य कार्यसाधनीं

हाच शाप नव्हे कां हो
आव्हान विक्रमाप्रती ?
हाच शाप ठरे कीं हो
शुभाशीर्वाद शेवटीं

'निर्मनुष्य करायाची
धरा' ह्या हेतुनें जरी
मांडलें पंचभूतांनीं
थैमान धरणीवरी

अंगठ्याएव्हढा जीव
वटपत्रावरी सान
प्रळयीं तगला, झाला
विश्वव्यापक मागुन.

भरारी नव चैतन्यें
चिताभस्मांतुनी पुन्हां
घेई फोनिक्स पक्षी, तें
पुनरुत्थान आपणां—

साध्य व्हावें न कां? आली
आपत्ति जरि दुर्धर?
होतसे नव चैतन्या
आपत्तीच पयोधर.

नदीनें ओढुनी नेलें
लक्ष्मीला सागराकडे
परंतु हेंहि ठावें कीं
तिला पंकज आवडे.

पंकजा फुलवूं या हो
येथल्या चिखलांतुनी
नांदाया तिजला आणूं
आणि ह्या पंकजांतुनी

११९८७०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............... विः ..............
क्रमांक .................. नोंः दिः ..............

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 39354 विः काव्य
क्रमांक 9428 नोंः दिः 30/8/54

REFBK-0011970
REFBK-0011970